**ठळक बातम्या**

- देशाच्या इतिहासातल्या महत्त्वाच्या घटनांप्रमाणे महाकुंभाची नोंद होईल, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी लोकसभेत प्रतिपादन

- नागपूर हिंसाचारात पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करण्याची मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची ग्वाही /शांतता राखण्याचं सर्वांना आवाहन

- अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे पृथ्वीच्या दिशेनं निघाले

- मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स १ हजार १३१ अंकांची वाढ नोंदवत पुन्हा ७५ हजाराच्या पातळीवर

**आणि**

- इंग्लंडमधे सुरु असलेल्या कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघाची विजयी सलामी

**<><><><><>**

देशाच्या इतिहासातल्या महत्त्वाच्या घटनांप्रमाणे महाकुंभाची नोंद होईल असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज लोकसभेत सांगितलं. लहानसहान सोयी सुविधांची पर्वा न करता कोट्यवधी भाविक या महामेळाव्यात सहभागी झाले होते असं ते म्हणाले. अशा उत्सवांमुळे आपल्या परंपरा, आणि वारशाचं भव्य दर्शन जगाला मिळालं असं त्यांनी सांगितलं. प्रयागराज इथल्या संगमातलं पाणी मॉरिशसच्या दौऱ्यावर असताना आपण तिथल्या गंगा तलावात अर्पण केलं याचा उल्लेख प्रधानमंत्र्यांनी यावेळी केला. महाकुंभापासून प्रेरणा घेऊन देशभरात नदी उत्सव झाले पाहिजेत अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. हा भव्य सोहळा यशस्वी झाल्याबद्दल त्यांनी सरकारचं आणि जनतेचं कौतुक केलं.

प्रधानमंत्र्यांना हे निवेदन करण्याची परवानगी कोणत्या नियमाखाली दिली, असा प्रश्न उपस्थित विरोधी पक्ष सदस्यांनी गदारोळ केला. त्यावर प्रधानमंत्री किंवा इतर मंत्री सभागृहात निवेदन करु शकतात अशी तरतूद नियमात असल्याचं सभापती ओम बिरला यांनी सांगितलं. मात्र गदारोळ चालूच राहिल्यानं कामकाज आधी एक वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करावं लागलं.

**<><><><><>**

नागपुरात काल झालेला हिंसाचार पूर्वनियोजित असल्याचं प्रथमदर्शनी दिसत असून पोलिसांवर हल्ला करणाऱ्यांवर कडक कारवाई करू, असा इशारा मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी आज विधानसभेत दिला. काल रात्री नागपुरात झालेल्या हिंसाचाराबद्दल मुख्यमंत्र्यांनी आज सभागृहात निवेदन दिलं. सर्व समुदायांचे सण-उत्सव सध्या सुरू आहेत आणि अशा वेळी सर्वांनीच एकमेकांप्रति आदरभाव राखावा, शांतता राखावी, असं आवाहनही त्यांनी केलं.

कुणालाही कायदा आणि सुव्यवस्था हातात घेऊ देणार नाही, अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली….

**होल्ड - मुख्यमंत्री बाइट**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनीही नागपूरच्या घटनेबाबत विधान परिषदेत निवेदन दिलं.

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी याप्रकरणी सरकारवर टीका केली….

**होल्ड - बाईट - उद्धव ठाकरे……**

**<><><><><>**

राज्यात बेकायदेशीररित्या वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशींच्या शोधार्थ राज्य सरकारनं स्वतःहून एक मोहीम राबवली असून, येत्या तीन महिन्यात अशा बांगलादेशींना स्थानबद्ध करण्यासाठी एक केंद्र निर्माण केलं जाईल अशी माहिती

गृहराज्यमंत्री योगेश कदम यांनी विधानसभेत दिली, या संदर्भातल्या लक्षवेधी सूचनेवर ते उत्तर देत होते.

बांगलादेशातून येणाऱ्या या नागरिकांपैकी काहींची कागदपत्र योग्य निघाली आहेत तर काहींची आधार कार्ड देखील बनलेली आहेत आणि ती आधार कार्ड वैध ठरलेली आहेत. अशा पद्धतीनं बनवलेली कागदपत्रं बोगस आहेत का याची तपासणी करण्यासाठी पश्चिम बंगाल सरकार सहकार्य करत नाही हीच मोठी अडचण असल्याचं मंत्री कदम यांनी यावेळी सांगितलं. या संदर्भातली सगळी माहिती केंद्र सरकारकडे दिली असून केंद्रीय गृहमंत्री या संदर्भात गांभीर्यानं लक्ष घालत आहेत, असंही कदम यावेळी म्हणाले.

**<><><><><>**

नगर विकास, सार्वजनिक बांधकाम, विधी आणि न्याय, सामाजिक न्याय, इतर मागास आणि बहुजन कल्याण, या विभागांच्या अर्थ संकल्पातल्या अनुदान मागण्या विधान सभेत आज मंजूर करण्यात आल्या.

**<><><><><>**

अंतराळवीर सुनीता विल्यम्स आणि बुच विल्मोर हे पृथ्वीच्या दिशेनं यायला निघाले आहेत. एकूण चार अंतराळवीरांना घेऊन येणारं ड्रॅगन हे यान आज सकाळी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकापासून वेगळं झालं. ताशी सुमारे २७ हजार किलोमीटर वेगानं ते पृथ्वीच्या वायूमंडळात प्रवेश करेल. पृथ्वीपासून १८ हजार फूट उंचीवर आल्यावर दोन ड्रॅगन पॅराशूट उघडली जातील तर सहा हजार फुटांवर मुख्य पॅराशूट उघडली जातील. भारतीय प्रमाणवेळेनुसार उद्या पहाटे साडे तीनच्या सुमारास अंतराळवीर समुद्रात उतरण्याची अपेक्षा आहे. पृथ्वीवर सुरक्षित परतल्यावर भारताला भेट देण्याचं आमंत्रण प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी सुनीता विल्यम्स यांना पत्राद्वारे दिलं आहे.

**<><><><><>**

शेअर बाजारात आज खरेदीचा जोर होता. दिवसाच्या सुरुवातीला ४३८ अंकांनी वर गेलेला मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स नंतर काहीसी विक्रीच्या दबावाखाली आल्याचं दिसलं, मात्र नंतर सातत्याने खरेदी झाल्यामुळं निर्देशांक १ हजार २१५ अंकांची झेप घेत ७५ हजारांची पातळी ओलांडून गेला. दिवसअखेरीस किंचित खाली घसरून कालच्या तुलनेत १ हजार १३१ अंकांची तेजी नोंदवत सेन्सेक्स ७५ हजार ३०१ वर बंद झाला.

राष्ट्रीय शेअर बाजाराचा निफ्टी कालच्या तुलनेत ३२५ अंकांनी वधारुन २२ हजार ८३४वर बंद झाला.

**<><><><><>**

इंग्लंडमधे सुरु असलेल्या कबड्डी विश्वचषक स्पर्धेत भारतीय महिला संघानं विजयी सलामी दिली आहे. ड गटात वॉल्व्हरपॅम्प्टन इथं आज संध्याकाळी झालेल्या सामन्यात भारतीय महिला संघानं वेल्स संघावर ८९-१८ असा दणदणीत विजय नोंदवला.

भारतीय पुरुष संघांचा दुसरा सामना आज रात्री स्कॉटलंडबरोबर होणार आहे. या स्पर्धेत महिला आणि पुरुष अशा दोन्ही गटांमधे भारत गतविजेता आहे.

**<><><><><>**

आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्री तसंच भाजपा अध्यक्ष जे पी नड्डा यांनी आज न्यूझिलंडचे प्रधानमंत्री ख्रिस्तोफर लक्झॉन यांची भेट घेतली.  नवी दिल्लीत झालेल्या या भेटीत बोलताना नड्डा यांनी नवजात शिशू ते वयोवृद्ध यांच्यासाठीच्या आरोग्य सुविधांमध्ये देशाने केलेली प्रगती अधोरेखित केली.

**<><><><><>**

भारत आणि न्यूझीलंड यांच्यातल्या मुक्त व्यापार कराराबाबतच्या चर्चेमुळे उभय देशांमधले संबंध दृढ होतील, असा विश्वास केंद्रीय वाणिज्य आणि उद्योगमंत्री पीयूष गोयल यांनी आज व्यक्त केला. ते नवी दिल्लीत भारत- न्यूझीलंड आर्थिक मंचाला संबोधित करत होते. येत्या दहा वर्षांमध्ये दोन्ही देशांमधील व्यापार दहा पट वाढण्याची शक्यताही त्यांनी बोलून दाखवली. दोन्ही देश तरुणाईला आपल्या सामर्थ्याचा वापर करण्याची संधी उपलब्ध करून देत असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

विद्यमान कायदे आणि सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार मतदार ओळखपत्रं आधार कार्डाशी जोडली जाणार असल्याचं केंद्रीय निवडणूक आयोगानं ठरवलं आहे. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी आज केंद्रीय गृह, संसदीय कार्य, तसंच इलेक्ट्रॉनिक्स तसंच माहिती तंत्रज्ञान खात्याचे सचिव आणि आधार प्राधिकरणाचे मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांसोबत नवी दिल्लीत आज बैठक घेतली, त्यात हा निर्णय झाला. यासंदर्भात आधार प्राधिकरण आणि निवडणूक आयोगाच्या तांत्रिक तज्ज्ञांची चर्चा लवकरच सुरू होणार असल्याची माहिती निवडणूक आयोगानं निवेदनाद्वारे दिली आहे.

**<><><><><>**

नवी दिल्लीत भारत मंडपम इथं क्षयरोग निर्मूलन उपायांसाठी आयोजित 'इंडिया इनोव्हेशन समिट - पायोनियरिंग सोल्युशन्स टू एंड टीबी' या कार्यक्रमाचं उद्घाटन आज केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण राज्यमंत्री अनुप्रिया पटेल यांनी केलं. देशाला २०२५ पर्यंत क्षयरोग मुक्त करणं हे या संमेलनाचं उद्दिष्ट्य आहे. भारतातून क्षयरोगाचं समूळ उच्चाटन करण्यासाठी विविध पातळ्यांवर भरीव प्रयत्न सुरू असल्याचं पटेल यांनी सांगितलं.

**<><><><><>**

इस्त्राईलच्या हवाई दलानं काल रात्री गाझावर केलेल्या हवाई हल्ल्यात ठार झालेल्या नागरिकांची संख्या ४०० झाली आहे. पॅलेस्टाईनच्या आरोग्य अधिकाऱ्यांच्या मते या हल्ल्यात ५०० पेक्षा जास्त नागरिकांचा मृत्यू झाला आहे. इस्त्राईल आणि हमास यांच्यातल्या संघर्ष विरामासंदर्भातील चर्चा निष्फळ ठरल्यानंतर हा हल्ला झाला. १९ जानेवारी दोघांनी संघर्ष विराम करण्याचा निर्णय जाहीर केल्यानंतरचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा हल्ला असल्याचं सांगितलं जात आहे.

**<><><><><>**

प्राप्तीकर विधेयक २०२५ मधे सुचवलेल्या विविध तरतुदींसंदर्भात केंद्रीय प्रत्यक्षकर नियंत्रण मंडळाने  संबंधितांकडून सूचना आणि हरकती मागवल्या आहेत. याकरता इ फायलिंग पोर्टलवर विशेष सुविधा दिली आहे. करभरणा प्रक्रीया सुलभ करण्याच्या उद्देशाने या सूचना मागवण्यात आल्या असून त्या एकत्रितपणे विषय समितीकडे पाठवण्यात येतील. प्राप्तीकर विधेयक २०२५ सध्या विषयसमितीकडे अभ्यासाकरता पाठवलेलं आहे.

**//<><><><><>//**